19 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी गतीने करा

## चंद्रकांत पाटील : शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी वर्धापन दिन उत्साहात : विद्यापीठ गीताचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शिवाजी विद्यापीठाने गतीने करावी. या धोरणामधील विविध उच्चशिक्षण, कौशल्यविकासाच्या संधी व्यापक समाजघटकांपर्यंत नेण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने काम करावे. डिजीलॉकरसारख्या नवतंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थीभिमुखता विकसित करावी, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी येथे केले. शिक्षण, संशोधनात विद्यापीठ अग्रेसर असून सामाजिक बांधीलकीही कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.




कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते 'विद्यापीठ गीता'चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी डावीकडून डॉ. प्रमोद पाटील, दिगंबर शिर्के, संजय डी. सावंत, विलास शिंदे उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहातील या कार्यक्रमास दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. कृषी व अकृषी विद्यापीठांमध्ये सुसंवाद प्रस्थापित होऊन तो वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने वर्धापनदिन समारंभास प्रथमच कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंना आमंत्रित करून सकारात्मक पाऊल उचलले आहे. मूलभूत संशोधनाचे उपयोजित संशोधन, तंत्रज्ञानात रूपांतर करून त्याचे लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे कुलगुरू डॉ. सावंत यांनी सांगितले. विद्यार्थीकेंद्री उपक्रम राबविण्यामध्ये शिवाजी विद्यापीठ सदैव आघाडीवर आहे. नवे शैक्षणिक धोरण राबविण्याच्या दिशेनेही विद्यापीठाने आघाडी घेतली असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. या कार्यक्रमात मंत्री पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ गीताचे लोकार्पण करण्यात आले. गीतकार प्रा. गोविंद काजरेकर, प्रवीण बांदेकर, संगीतकार अमित साळोखे, आदींचा सत्कार करण्यात आला. विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. एम. जी. ताकवले, भारती पाटील, आदी उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

**मत्स्यालयाला निधी शासन देणार**

कुलगुरू डॉ. सावंत यांनी शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय उभारण्यासाठी सहकार्य केले जाईल, असे सांगितले. त्यावर मंत्री पाटील यांनी त्यासाठी लागणाऱ्या सर्व निधी राज्य शासनामार्फत देण्याची ग्वाही दिली.

### शिवाजी विद्यापीठ गीत...

कीर्ती तुझी मंगलमय स्मरणी असू दे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसू दे.
सांगू वसा छत्रपती शिवरायांचा
राजर्षी शाहूंच्या लोकहिताचा
सत्य न्याय समतेच्या सत्त्वशीलाचा
हेच स्वप्न मनोमनी सदा नांदू दे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसू दे.
ज्ञानाचे विद्येचे विश्व उमलू दे
जात धर्म वर्ण वंश भेद मिटू दे
मातीतून उगवूदेत रंग कलेचे
प्रज्ञेची प्रतिभेची प्रभा दिसू दे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसू दे.
विज्ञाना सदोदित घेत साथीला
शिक्षणाचा नित्य नवा मार्ग शोधिला
राष्ट्रप्रेम मानवता-धर्म मानिला
संचित हे श्वासांतून सतत वाहू दे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसू दे.
श्रम आणि ज्ञानाचा सेतू बांधूनी
बहुजनां उजेडी नेई तमातूनी
कला क्रीडा शोधांची जननी होऊनी
विद्यापीठ आपुले जगी गर्जू दे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसू दे.

### सुवर्णमहोत्सव निधीतील साडेपाच कोटी मिळाले

मंत्री पाटील यांनी ग्वाही दिल्याप्रमाणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सव निधीपैकी ५ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी गुरुवारी शासनाकडून प्राप्त झाल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी दिली.

19 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्धापनदिनी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय डी. सावंत आणि कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ, महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक, कर्मचारी पुरस्कारांचे वितरण झाले. त्यात डावीकडून अण्णा पाटील, उषा पाटील, प्रकाश कांबळे, उत्तम सकट, धैर्यशील यादव, सदानंद लोखंडे, बाळू नलवडे, शिवाजी भोसले, चेतन पाटोळे, दत्तात्रय खराडे यांना गौरविण्यात आले. शेजारी प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

# हीरकमहोत्सवी वर्धापनदिनी गुणवंत शिक्षक, कर्मचाऱ्यांचा गौरव

## विविध पुरस्कारांचे वितरण : नॅनो सायन्स, ग्रंथालय अधिविभाग ठरले उत्कृष्ट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्धापनदिनी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत यांच्या हस्ते विद्यापीठ, महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक, कर्मचाऱ्यांना पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

### विद्यापीठ गीताच्या लोकार्पणाचा आनंद

गेली ६० वर्षे विद्यापीठ गीत नव्हते. मी याबाबतचा ठराव व्यवस्थापन परिषदेत मांडला. त्यानंतर गीत तयार करण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाली. हीरक महोत्सवात या गीताचे लोकार्पण झाल्याचा आनंद, अभिमान वाटतो, अशी प्रतिक्रिया डॉ. भारती पाटील यांनी व्यक्त केली.

गुणवंत शिक्षक पुरस्कार अर्थशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रकाश कांबळे, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार कऱ्हाडमधील डॉ. अण्णा पाटील (कऱ्हाड) यांना, तर प्राचार्य सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार कोल्हापुरातील डॉ. उषा पाटील यांना प्रदान करण्यात आला. डॉ. उत्तम सकट, धैर्यशील यादव, सदानंद लोखंडे, बाळू नलवडे (गुणवंत सेवक), डॉ. प्रवीण चौगुले (गुणवंत प्राचार्य), डॉ. शिवाजी भोसले (गुणवंत शिक्षक), चेतन पाटोळे, दत्तात्रय खराडे (महाविद्यालयीन गुणवंत सेवक) यांना गौरविण्यात आले. गुणवंत पाल्यांचा विद्यापीठ प्रशासकीय, कल्याण निधी पारितोषिके देऊन सत्कार केला.

यंदा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांना देण्यात आला. १० लाख रुपये, प्रमाणपत्र, छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. दरम्यान, सकाळी साडेआठ वाजता प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. सावंत यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

19 NOV 2022

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सिनेट' सभागृहात २९ नवे चेहरे

## नव्या सदस्यांमध्ये उत्सुकता : काम करण्याची मोठी संधी

संतोष मिठारी

लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा (सिनेट) आणि विविध अधिकार मंडळांची निवडणूक चुरशीने झाली. त्यातून निवडून आलेले आणि बिनविरोध विजयी झालेल्या ३८ पैकी २९ जण पहिल्यांदाच सभागृहात पाऊल ठेवणार आहेत. त्यामुळे यंदा नव्या चेहऱ्यांची 'सिनेट' असणार आहे. या नवोदित सदस्यांमध्ये उत्सुकता आहे.

सिनेट निवडणुकीत विकास आघाडी आणि विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) विविध अधिकार मंडळांत नव्या चेहऱ्यांना उमेदवारी दिली. काही ठराविक जणांना त्यांचा अनुभव आणि निवडणुकीतील तडजोडीमुळे पुन्हा उमेदवारी दिली. विकास आघाडीकडून प्रकाश पाटील, पृथ्वीराज पाटील, मंजिरी मोरे, राजेंद्र शेजवळ, तेजस्विनी मुडेकर, सूर्यकांत कैंगार, बी. एस. सावंत, अरुण पाटील, सर्जेराव पाटील, संजय सावंत, रघुनाथ ढमकले, प्रशांत खरात, अमित जाधव, स्वागत परुळेकर, अजित पाटील, वर्षा मैंदर्गी, जगदीश सपकाळे, रतन कांबळे, अभिषेक मिठारी, उषा पवार यांना पहिल्यांदा संधी मिळाली.

'सुटा'कडून बबन सातपुते, ज्ञानदेव काळे, डी. एन. पाटील, निवास वरेकर, शिवाजी बोथीकर, शाहीन पटेल, सुनील बनसोडे, पोपट पाटील, राजेश निमट यांना पहिल्यांदाच सिनेटमध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे.

### 'शिव-शाहू' आघाडीचा प्रवेश

या निवडणुकीच्या रिंगणात पहिल्यांदाच शिव-शाहू आघाडी उतरली. त्यांनी नोंदणीकृत पदवीधरमधील आठ जागा लढविल्या. त्यातील श्वेता परुळेकर ही एकमेव विजयी उमेदवार ठरली. तिच्या माध्यमातून या आघाडीचा सिनेटमध्ये प्रवेश झाला आहे.



### यांना पुन्हा संधी

विकास आघाडीचे लोभाजी भिसे, विष्णू खाडे, वैभव पाटील, अमित कुलकर्णी, व्ही. एम. पाटील, अमरसिंह रजपूत, तर सुटाच्या प्रकाश कुंभार, मनोज गुजर, सुनील चव्हाण यांना सिनेट आणि इतर अधिकार मंडळांवर काम करण्याची यंदा पुन्हा संधी मिळाली आहे.

### सर्व घटकांना न्याय द्यावा...

नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली हे चांगले आहे. त्यांनी पुढील पाच वर्षे गट-तट बाजूला ठेवून सर्व घटकांना न्याय देण्याची भूमिका घेऊन कार्यरत रहावे. नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी योगदान द्यावे. विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, संस्थाचालक, कर्मचारी यांचे प्रश्न सिनेटच्या माध्यमातून सोडवावेत, अशी प्रतिक्रिया प्रा. मधुकर पाटील यांनी व्यक्त केली.

19 NOV 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक धोरणातील कौशल्य विकास संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवा

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील; शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव : विद्यापीठ गीताचे लोकार्पण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने गेल्या साठ वर्षांत शिक्षण व संशोधनाच्या क्षेत्रात प्रगती केली आहे. त्याचबरोबरीने सामाजिक बांधिलकीही प्राधान्याने जोपासली आहे. केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी गतीने करण्याच्या दिशेने विद्यापीठाने काम करावे. धोरणामधील विविध उच्च शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या संधीचा लाभ विद्यार्थी व समाजघटकांपर्यंत नेण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या वर्धापन दिन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झालेल्या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. मंत्री पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ गीताचे लोकार्पण करण्यात आले. गीतकार प्रा. गोविंद काजरेकर, प्रा. प्रवीण बांदेकर व संगीतकार अमित साळोखे यांच्यासह गायक, कलाकारांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार अर्थशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रकाश कांबळे यांना देण्यात आला. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. अण्णा काका पाटील (कराड) यांना, तर प्राचार्य सुमतीबाई पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार डॉ. उषा बाहुबली पाटील यांना प्रदान करण्यात आला.

मंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठाची स्थापना करीत असताना यशवंतराव चव्हाण यांनी छोट्यात छोट्या गावातल्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षणाची गंगा नेण्याचे स्वप्न बाळगले होते. यशवंतरावांचे ते स्वप्न विद्यापीठाने पूर्ण केले आहे. शिवाय विद्यापीठाचा लौकिक देश-विदेशात उंचावला आहे. कोरोनाच्या कालखंडातील कार्य असो की महापूर काळात लोकांना दिलासा देण्याचे काम असो, विद्यापीठाने ही कामे आत्मियतेने केली.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या वर्धापनदिन समारंभात बोलताना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील. व्यासपीठावर कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)**

कुलगुरू डॉ. सावंत म्हणाले, महाराष्ट्रात कृषी व अकृषी विद्यापीठांमध्ये सुसंवाद प्रस्थापित होऊन तो वाढविण्याची आवश्यकता आहे. अकृषी विद्यापीठांमध्ये मूलभूत संशोधन मोठ्या प्रमाणावर चालते. कृषी विद्यापीठांत उपयोजित संशोधनावर भर असतो. मूलभूत संशोधनाचे उपयोजित संशोधनात व तंत्रज्ञानात रूपांतर करून त्याचे लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नवे शैक्षणिक धोरण राबविण्याच्या दिशेने विद्यापीठाने आघाडी घेतली आहे. अभ्यासक्रमांत बहुद्वार प्रवेश व बहुद्वार निर्गमनाची सुविधा विद्यार्थ्यांना दिली आहे. विद्यापीठाने आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम सुविधा धोरण स्वीकारले आहे.

याप्रसंगी विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांना विद्यापीठ प्रशासकीय व कल्याण निधीतून पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कारप्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'नॅक'चे 'अ+' मानांकन मिळविणाऱ्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ग्वाही दिल्याप्रमाणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सव निधीपैकी ५.३५ कोटी रुपयांचा निधी कालच शासनाकडून प्राप्त झाल्याची माहिती त्यांनी दिली. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील, सुष्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

**उत्कृष्ट अधिविभागाचा पुरस्कार नॅनोसायन्स व ग्रंथालयशास्त्र अधिविभागास**

यंदा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांना देण्यात आला. विभागास पारितोषिकाचे दहा लाख रुपये, प्रमाणपत्र व छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा प्रदान करण्यात आला.

**'विद्यापीठ आपुले जगी गर्जू दे...' विद्यापीठ गीताचे टाळ्यांच्या गजरात स्वागत**

'कीर्ती तुझी मंगलमय स्मरणी असू दे, ज्ञान हेच अमृत हे ब्रीद असू दे... विद्यापीठ आपुले जगी गर्जू दे...' या विद्यापीठ गीताचे मंत्री पाटील यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्यानंतर सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात गीताचे स्वागत केले. गीताप्रती आदरभाव व्यक्त करताना उभे राहून सामूहिक गायन केले गेले.

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक : डॉ. प्रकाश शंकर कांबळे, अर्थशास्त्र अधिविभाग. विद्यापीठातील गुणवंत सेवक : डॉ. उत्तम सकट, साहाय्यक कुलसचिव, लेखा विभाग, धैर्यशील यादव, वरिष्ठ साहाय्यक, पगापत्रके विभाग, सदानंद लोखंडे, वाहनचालक, वाहन विभाग, बाळू नलवडे, हवालदार, संलग्नता टी-२ विभाग. संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य : डॉ. प्रवीण चौगुले, डी. आर. माने महाविद्यालय, कागल. संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक : डॉ. शिवाजी भोसले, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, कराड. महाविद्यालयीन गुणवंत सेवक : चेतन कृष्णात पाटोळे, प्रयोगशाळा साहाय्यक, न्यू कॉलेज, दत्तात्रय खराडे, ग्रंथालय परिचर, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर (जि. सातारा). बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. अण्णा काका पाटील, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड. प्राचार्य श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका : डॉ. उषा बाहुबली पाटील, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

---

# शिवाजी विद्यापीठात उभारण्यात येणाऱ्या मत्स्यालयासाठी निधी देऊ : चंद्रकांत पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. त्यासाठी लागणाऱ्या सर्व निधीची तरतूद ही राज्य शासनामार्फत करण्याची घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत यांनी केली.

शिवाजी विद्यापीठ हिरक महोत्सवी वर्धापन दिन कार्यक्रमात ते बोलत होते. मंत्री पाटील म्हणाले, कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय उभारण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने सर्वंकष प्रस्ताव राज्य शासनाला सादर करावा. शिक्षण सचिवांना याबाबत तात्काळ निधीची तरतूद करण्याबाबत सूचना देऊ. त्याचप्रमाणे कौशल्य विकास, विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे व त्यांना सुरक्षा व प्रतिकाराचे प्रशिक्षणससह अभिनव उपक्रमासाठीचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंत्री पाटील यांनी मत्स्यालयासाठी निधी देण्याच्या घोषणेचे स्वागत केले.

कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सावंत यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासमवेत प्राथमिक चर्चा केली. जानेवारी २०२३ मध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठात या संदर्भातील सामंजस्य करार करण्यात येणार आहे. त्यासाठी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक यांना कृषी विद्यापीठात आमंत्रित केले जाणार आहे.

19 NOV 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीही जोपासली

## मंत्री चंद्रकांत पाटील | शिवाजी विद्यापीठाचा ६० वा वर्धापनदिन उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**शिवाजी विद्यापीठाने साठ वर्षांत शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रात तर प्रगती केलीच, त्याबरोबरच सामाजिक बांधिलकीही प्राधान्याने जोपासली, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी शुक्रवारी येथे काढले. शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या वर्धापनदिन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.**

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झालेल्या या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत, तर अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी मंत्री पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ गीताचे लोकार्पण करण्यात आले. या गीताचे गीतकार प्रा. गोविंद काजरेकर व प्रा. प्रवीण बांदेकर व संगीतकार अमित साळोखे यांच्यासह गायक कलाकारांचा सत्कारही करण्यात आला.

मंत्री पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाची स्थापना करताना यशवंतराव चव्हाण यांनी छोट्या-छोट्या गावांतल्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षणाची गंगा नेण्याचे स्वप्न बाळगले होते. त्यांचे ते स्वप्न विद्यापीठाने पूर्ण केलेच, शिवाय विद्यापीठाचा लौकिक देश-विदेशातही उंचावला.

प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. सावंत म्हणाले, अकृषी विद्यापीठांमध्ये मूलभूत संशोधन मोठ्या प्रमाणावर चालते, तर कृषी विद्यापीठांत उपयोजित संशोधनावर भर असतो. या पार्श्वभूमीवर, येथील मूलभूत संशोधनाचे उपयोजित संशोधनात व तंत्रज्ञानात रुपांतर करून त्याचे लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची नितांत गरज आहे. त्या दृष्टीने प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी काल कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासमवेत प्राथमिक चर्चा करण्यात आली. येत्या जानेवारी २०२३मध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठात या संदर्भातील सामंजस्य करार करण्यासाठी कुलगुरू डॉ. शिर्के यांना त्यांनी आमंत्रितही केले.




कोल्हापूर : उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते 'विद्यापीठ गीता'चे लोकार्पण करण्यात आले. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थीकेंद्री उपक्रम राबवण्यामध्ये शिवाजी विद्यापीठ सदैव आघाडीवर असून, नवनवीन शैक्षणिक व संशोधकीय उपक्रमांचा लाभ विद्यार्थ्यांना करवून देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. दरम्यान, विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार अर्थशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रकाश शंकर कांबळे यांना देण्यात आला. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. आण्णा काका पाटील यांना, तर प्राचार्य श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार डॉ. उषा बाहुबली पाटील यांना प्रदान करण्यात आला.

### मत्स्यालयासाठी निधी देऊ : पाटील

प्रमुख पाहुणे डॉ. सावंत यांनी शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय उभारण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली, तर शिवाजी विद्यापीठाने सर्वंकष प्रस्ताव शासनाला सादर करावा. त्यासाठी लागणाऱ्या सर्व निधीची तरतूद राज्य शासनामार्फत करण्याची ग्वाही मंत्री पाटील यांनी दिली.

### "शिवाजी विद्यापीठ गीत"

कीर्ती तुझी मंगलमय स्मरणी असूदे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसूदे ।।धृ।।
सांगू वसा छत्रपती शिवरायांचा
राजर्षी शाहूंच्या लोकहिताचा
सत्य न्याय समतेच्या सत्त्वशीलाचा
हेच स्वप्न मनोमनी सदा नांदूदे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसूदे ।।१।।
ज्ञानाचे विद्येचे विश्व उमलूदे
जात धर्म वर्ण वंश भेद मिटूदे
मातीतून उगवू देत रंग कलेचे
प्रज्ञेची प्रतिभेची प्रभा दिसूदे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसूदे ।।२।।
विज्ञाना सदोदित घेत साथीला
शिक्षणाचा नित्य नवा मार्ग शोधिला
राष्ट्रप्रेम मानवता-धर्म मानिला
संचित हे श्वासांतून सतत वाहूदे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसूदे ।।३।।
श्रम आणि ज्ञानाचा सेतू बांधूनी
बहुजनां उजेडी नेई तमातूनी
कला क्रीडा शोधांची जननी होऊनी
विद्यापीठ आपुले जगी गर्जूदे
ज्ञान हेच अमृत हे ब्रीद वसूदे ।।४।।

गीतकार : प्रा. गोविंद काजरेकर
प्रा. प्रवीण बांदेकर
संगीतकार : अमित साळोखे

19 NOV 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीही जपली

## मंत्री चंद्रकांत पाटील; विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी वर्धापन दिन सोहळा दिमाखात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाने गेल्या साठ वर्षांत शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रात तर प्रगती केलीच; पण त्याचबरोबरीने सामाजिक बांधिलकीही प्राधान्याने जोपासली, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे काढले. शिवाजी विद्यापीठाच्या साठाव्या वर्धापन दिनी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रम समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत, तर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ गीताचे लोकार्पण झाले. या वेळी डावीकडून प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे.**

मंत्री पाटील म्हणाले, ''केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी गतीने करण्याच्या दिशेने आता शिवाजी विद्यापीठाने काम करावे. अलीकडेच शासनाने 'युनिसेफ' समवेत एक महत्त्वाचा करार केला. याअंतर्गत जलसंवर्धन आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा विकास करण्यासाठी बहुस्तरित प्रयत्न करण्याचे निश्चित केले आहे. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आदींच्या माध्यमातून या सामाजिक जाणिवा वृद्धिंगत करण्यासाठी शैक्षणिक संस्थांचे सहकार्य अपेक्षित आहे.''

कार्यक्रमाला विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. मंत्री श्री. पाटील यांनी ग्वाही दिल्याप्रमाणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सव निधीपैकी पाच कोटी ३५ लाखांचा निधी कालच शासनाकडून प्राप्त झाल्याची माहिती त्यांनी या वेळी दिली. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

**मत्स्यालयासाठी लागणारा सर्व निधी देऊ**

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय उभारण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्या अनुषंगाने बोलताना मंत्री पाटील यांनी, शिवाजी विद्यापीठाने यासाठीचा सर्वंकष प्रस्ताव शासनाला सादर करावा. त्यासाठी लागणाऱ्या सर्व निधीची तरतूद ही राज्य शासनातर्फे करण्याची ग्वाही त्यांनी या वेळी दिली. त्याचप्रमाणे कौशल्य विकास, विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे, त्यांना सुरक्षा व प्रतिकाराचे प्रशिक्षण यांसह काही अभिनव उपक्रम असतील, तर त्यासाठीही प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन त्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांना केले.

### जानेवारीत सामंजस्य करार

डॉ. सावंत म्हणाले, ''महाराष्ट्रात कृषी व अकृषी विद्यापीठांतील सुसंवाद वाढवण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने वर्धापन दिन समारंभास प्रथमच कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंना आमंत्रित करून सकारात्मक पाऊल उचलले आहे. मूलभूत संशोधनाचे उपयोजित संशोधनात व तंत्रज्ञानात रूपांतर करून त्याचे लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची नितांत गरज आहे. त्या दृष्टीने प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासमवेत प्राथमिक चर्चा झाली. येत्या जानेवारीमध्ये या संदर्भातील सामंजस्य करार करण्यासाठी कुलगुरू डॉ. शिर्के यांना डॉ. सावंत यांनी आमंत्रित केले.

**विद्यार्थीकेंद्री उपक्रम राबविण्यामध्ये विद्यापीठ सदैव आघाडीवर असून नवनवीन उपक्रमांचे लाभ विद्यार्थ्यांना करवून देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. शिष्यवृत्ती, संशोधनवृत्ती आदी प्रोत्साहनपर उपक्रम राबविले आहेत. मातृभाषेतून शिक्षणाचा भाग म्हणून कायदा विषयाच्या परीक्षा इंग्रजीसह मराठीतून घेण्यास सुरुवात केली आहे.**

**- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

19 NOV 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत यांच्या हस्ते विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना डॉ. प्रकाश शंकर कांबळे. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. त्यानंतर विविध पुरस्कार स्वीकारताना अनुक्रमे डॉ. उत्तम सकट, धैर्यशील यादव, सदानंद लोखंडे, बाळू नलवडे, डॉ. शिवाजी भोसले, चेतन पाटोळे, दत्तात्रय खराडे, डॉ. अण्णा काका पाटील, डॉ. उषा पाटील.

# गौरवगीताचे लोकार्पण अन् कर्तृत्ववंतांचा गौरव

## शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी सजला कौतुक सोहळा

**कोल्हापूर, ता. १८ :** शिवाजी विद्यापीठाच्या साठाव्या वर्धापन दिन सोहळ्यात आज 'विद्यापीठ आपुले जगी गर्जू दे...' या विद्यापीठ गौरवगीताचे लोकार्पण झाले. मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते लोकार्पण झाल्यानंतर सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात गीताचे स्वागत केले. सर्वांनी या गीताप्रती आदरभाव व्यक्त करताना उभे राहून सामूहिक गायन केले.

दरम्यान, गीताचे गीतकार प्रा. गोविंद काजरेकर व प्रा. प्रवीण बांदेकर व संगीतकार अमित साळोखे यांच्यासह गायक कलाकारांचा सत्कारही झाला.

विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार अर्थशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रकाश कांबळे यांना देण्यात आला. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. अण्णा काका पाटील (कराड) यांना, तर कै. प्राचार्य सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार डॉ. उषा पाटील (कोल्हापूर) यांना प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर 'नॅक'चे



'अ+' मानांकन मिळविणाऱ्या देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर व आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे आणि 'अ' मानांकन मिळविणाऱ्या जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर, गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कराड, यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, मालती वसंतदादा पाटील कन्या कॉलेज, उरुण-इस्लामपूर आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क, सातारा या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

### यांचाही गौरव

डॉ. उत्तम सकट (सहायक कुलसचिव, लेखा विभाग), धैर्यशील यादव (वरिष्ठ सहायक, पगारपत्रके विभाग), सदानंद लोखंडे (वाहनचालक), बाळू नलवडे (हावलदार) यांच्यासह संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले (डी. आर. माने महाविद्यालय, कागल), संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक डॉ. शिवाजी भोसले (सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, कराड), महाविद्यालयीन गुणवंत सेवक चेतन पाटोळे (प्रयोगशाळा सहायक, न्यू कॉलेज) दत्तात्रय खराडे (ग्रंथालय परिचर, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर जि. सातारा) यांचाही कार्यक्रमात गौरव झाला.

### नॅनोसायन्स व ग्रंथालयशास्त्र उत्कृष्ट अधिविभाग

शिवाजी विद्यापीठाने सन २०१९ पासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरुवात केली. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रे असे दोन गट करून अधिविभागांचे सर्वंकष काटेकोर मूल्यमापन करण्यात येऊन हा पुरस्कार देण्यात येतो. संबंधित विभागाला पारितोषिकापोटी दहा लाख रुपये, प्रमाणपत्र आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा प्रदान करण्यात येतो. यंदा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांना देण्यात आला.

19 NOV 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाने केला गुणवंताचा सन्मान

## कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के व कुलगुरु डॉ. संजय सावंत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य-शिक्षक-प्रशासकीय सेवक यांच्यासह शिक्षक-शिक्षकांचा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन शुक्रवारी गौरव करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत यांच्या हस्ते पुरस्कार व गौरव स्वीकारला.

विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला कुलगुरू डॉ. संजय सावंत यांच्या हस्ते पुष्पहार घालून व कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करुन वर्धापनदिन कार्यक्रमाला सुरुवात झाली. यानंतर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व




**कोल्हापूर : कराड येथील सदूगुरू गाडगे महाराज कॉलेजचे डॉ. अण्णा काका पाटील यांचा बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत.**

कुलगुरू डॉ. संजय सावंत यांच्या हस्ते गुणवंत शिक्षक पुरस्काराने अर्थशास्त्र अधिविभागाचे डॉ. प्रकाश शंकर कांबळे यांचा तर गुणवंत सेवक पुरस्काराने डॉ. उत्तम सकट (सहाय्यक कुलसचिव, लेखा विभाग), धैर्यशील यादव (वरिष्ठ सहायक, पगारपत्रके विभाग), सदानंद लोखंडे (वाहनचालक), बाळू नलवडे (हवालदार) यांचा गौरव करण्यात आला. गुणवंत प्राचार्य म्हणून डॉ. प्रवीण चौगुले (डी. आर. माने महाविद्यालय, कागल) यांचा आणि गुणवंत शिक्षक म्हणून डॉ. शिवाजी भोसले (सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, कराड) व महाविद्यालयीन गुणवंत सेवक म्हणून चेतन पाटोळे (प्रयोगशाळा सहाय्यक, न्यू कॉलेज) व दत्तात्रय खराडे (ग्रंथालय परिचर, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय) यांना गौरवले.

कराड येथील सदूगुरू गाडगे महाराज कॉलेजचे डॉ. अण्णा काका पाटील यांचा बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराने आणि डॉ. उषा बाहुबली पाटील यांचा (कै.) प्राचार्य श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मान केला. नॅकचे De+ मानांकन मिळालेले देवचंद महाविद्यालय (अर्जुननगर), राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागठाणे येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजचा आणि 'अ' मानांकन मिळालेल्या जयसिंगपूर कॉलेज, उरूण येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, मालती वसंतदादा पाटील कन्या कॉलेज, कराडमधील गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फार्मसी, हलकर्णीतील यशवंतराव चव्हाण कॉलेज आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशलवर्क, सातारा या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार केला.

उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागास यांना देण्यात आला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 NOV 2022
तरुण भारत

# नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थी विकासाची कास धरा

पान १ वरुन

त्या दृष्टीनेच शिवाजी विद्यापीठाने वर्धापनदिन कार्यक्रमास कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंना प्रथमच निमंत्रित करून एक सकारात्मक पाऊल टाकले आहे. अकृषी विद्यापीठांमध्ये मूलभूत संशोधन तर कृषी विद्यापीठात उपयोजित संशोधन केले जाते. हे संशोधन आता शेतकऱ्यांपर्यंत जाणे गरजेचे आहे, याची जाणीव ठेवून जानेवारी २०२३ मध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करुन त्यादृष्टीने पुढील पावले उचलली जातील. या करारासाठी कुलगुरू डॉ. शिर्के यांना निमंत्रित केले जाईल.

**विद्यार्थीकेंद्री उपक्रमात विद्यापीठ आघाडीवर : कुलगुरू डॉ. शिर्के**

शिवाजी विद्यापीठाच्या गेल्या वर्षभरातील वाटचालीचा आढावा घेऊन डॉ. शिर्के म्हणाले, नवे शैक्षणिक धोरण राबविण्याच्या दिशेने विद्यापीठाने पावले उचलत असताना अभ्यासक्रमात बहुद्वार प्रवेश व बहुद्वार निर्गमनाची सुविधाही विद्यार्थ्यांना दिली आहे. विद्यापीठाने आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम सुविधा धोरण स्वीकारले आहे. अर्थशास्त्रात एकात्मिक बीएस्सी, एमएस्सी अभ्यासक्रम, विद्यापीठस्तरावर बीसीए–एमसीए अभ्यासक्रमाची सुरुवात हे त्याची प्रमुख उदाहरणे आहेत. अर्थशास्त्र अधिविभाग स्वायत्त केला असून भविष्यात विज्ञानाकडीलही काही अधिविभाग स्वायत्त केले जातील. ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटसूमध्ये ६० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. उर्वरित नोंदणीही लवकरच पूर्ण केली जाईल. भविष्याची गरज म्हणून विद्यापीठात मत्स्यालय व विद्यार्थिनी वसतिगृह उभारण्याच्या हालचाली विद्यापीठाने सुरु केल्या आहेत.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जाहीर केल्याप्रमाणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सव निधीपैकी ५ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी शासनाकडून मिळाला असल्याचे विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार व क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी पसायदान व राष्ट्रगीत म्हणून वर्धापनदिन कार्यक्रमाची सांगता केली.

**मत्स्यालयासाठी लागणारा सर्व निधी देऊ : मंत्री पाटील**

कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय उभारण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्या अनुषंगाने बोलताना मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी, शिवाजी विद्यापीठाने यासाठीचा सर्वंकष प्रस्ताव शासनाला सादर करावा. त्यासाठी लागणाऱ्या सर्व निधीची तरतूद राज्य शासनामार्फत करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

अनसंपर्क कक्ष

1 9 NOV 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वर्धापन कार्यक्रमात विद्यापीठाचे गीत लोकार्पण करताना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील. सोबत डावीकडून प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

# नवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थी विकासाची कास धरा

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने गेल्या ६० वर्षात शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रात प्रगती केली आहे. सामान्य व गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणत सामाजिक बांधिलकीही प्राधान्याने जोपासली आहे. आता विद्यापीठाने एक पाऊल पुढे येत नवतंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थीभिमुखता विकासाची कास धरावी, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त (६० व्या) आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभास दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत हेही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाच्या गुणवंत शिक्षक पुरस्काराने अर्थशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रकाश शंकर कांबळे यांना सन्मानित केले. तसेच डॉ. अण्णा काका पाटील (कराड) यांना बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराने तर डॉ. उषा बाहुबली पाटील (कोल्हापूर) यांना (कै.) प्राचार्य श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्काराने गौरवले.

- शिवाजी विद्यापीठाचा ६० वा वर्धापनदिन विविध कार्यक्रमांनी साजरा
- विद्यापीठ गीताचे लोकार्पण, विद्यार्थी हितासाठी योगदान दिलेल्या प्राध्यापकांचा पुरस्कारांनी गौरव

### विद्यापीठ आपुले जगी गर्जू दे...

'कीर्ती तुझी मंगलमय स्मरणी असू दे, ज्ञान हेच अमृत हे ब्रीद असू दे...विद्यापीठ आपुले जगी गर्जू दे...' या विद्यापीठ गीताचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. प्रा. गोविंद काजरेकर व प्रा. प्रवीण बांदेकर यांनी लिहिलेल्या या गीताला अमित साळोखे यांनी संगीत दिले आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाची स्थापना करताना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार तत्कालिन मुख्यमंत्री (कै.) यशवंतराव चव्हाण यांनी प्रत्येक गावातील गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षणाची गंगोत्री नेण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. यशवंतरावांचे ते स्वप्न पूर्ण करतानाच विद्यापीठाने आपला लौकिक देशविदेशातही उंचावला. शिक्षण, संशोधनात शिवाजी विद्यापीठ आज अग्रेसर आहे. विद्यापीठाने नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे काम गतीमान करणेही तितकेच जरुरीचे आहे. शिवाय या नव्या धोरणामधील उच्चशिक्षण व कौशल्यविकासाच्या संधी समाजातील गरजू घटकांपर्यंत नेण्याची विद्यापीठाने तयारी करावी.

### कृषीतील संशोधनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून द्यावा

कुलगुरू डॉ. संजय सावंत म्हणाले, राज्यात कृषी व अकृषी विद्यापीठे ही विशिष्ट हेतूने निर्माण केली आहेत. उभय विद्यापीठांमध्ये सुसंवाद प्रस्थापित होऊन तो वृद्धिंगत करणे आवश्यक आहे.

पान ९ पहा